॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone : (02462) 229242, 43
Fax : (02462) 215572

ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com

परिपत्रक–०२

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : सेवाअंतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत Stage-I ते Stage-II (AL-11) व Stage-II ते Stage-III (AL-12) या स्तरावरील स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरिता दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत पात्र ठरलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्रावर सादर करण्याबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२५–२६/१६२१, दि. ०९/५/२०२६.
२) परिपत्रक क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२५–२६/१६९०, दि. २२/५/२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय परिपत्रकांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील पात्र सहाय्यक प्राध्यापकांच्या सेवाअंतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत Stage-I ते Stage-II (AL-11) व Stage-II ते Stage-III (AL-12) या स्तरावरील स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरिता जिल्हानिहाय CAS कॅम्प खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्र | CAS कॅम्प आयोजित दिनांक |
|---|---|---|
| ०१. | कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी. | १६/०९/२०२६ |
| ०२. | सायन्स कॉलेज, नांदेड. | २२/०९/२०२६ |
| ०३. | महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर. | लातूर जिल्हा CAS कॅम्पची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. |

मा. कुलगुरू महोदय यांच्या आदेशान्वये, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२६ पर्यंत CAS अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना त्यांचे प्रस्ताव संबंधित जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्रावर सादर करण्याची संधी देण्यात येत आहे. त्यानुसार, विद्यापीठाशी संलग्नित संबंधित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत स्थाननिश्चिती/पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे CAS प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह परभणी व नांदेड जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्रावर सादर करण्याची कार्यवाही करावी. **(लातूर जिल्हा CAS कॅम्पची कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी तसेच दि. १६/०९/२०२६ रोजी आयोजित परभणी व हिंगोली जिल्ह्यांसाठी कॅस कॅम्पमध्ये ज्या सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव सादर करू शकले नसतील, अशा अध्यापकांनी आपले प्रस्ताव नांदेड जिल्हा कॅस कॅम्प केंद्रावर महाविद्यालयामार्फतच सादर करावेत.)**

सदर प्रस्तावांची छाननी (Screening) व CAS अंतर्गत पुढील आवश्यक कार्यवाही संबंधित जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्रामार्फत नियमानुसार करण्यात यावी. तसेच, संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी पात्र सहाय्यक प्राध्यापकांना सदर परिपत्रकाची माहिती देऊन त्यांचे प्रस्ताव विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्हानिहाय CAS कॅम्प केंद्रावर सादर होतील, याची दक्षता घ्यावी. दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत CAS अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीसाठी पात्र ठरलेले सहाय्यक प्राध्यापकच सदर संधीसाठी पात्र राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

(कृपया मागे पहावे...)

तसेच यापूर्वी कळविल्यानुसार, जिल्हा केंद्रावरती प्रस्ताव सादर करत असतांना या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र (Format) मध्ये संबंधीत अध्यापकांनी संपूर्ण माहिती भरून त्याची एक प्रत Hard Copy मध्ये व एक Soft Copy केंद्रावरती प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

'ज्ञानतिर्थ परिसर' विष्णुपूरी, नांदेड.
जा.क्र.शैक्ष./मान्यता/कॅस/०२/२०२६–२७/463
दिनांक : 15/०९/२०२६

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड-४३१६०६

➢ प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. मा. प्राचार्य, सायन्स कॉलेज, नांदेड. (जिल्हा केंद्र नांदेड)
२. मा. प्राचार्य, कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी. (जिल्हा केंद्र परभणी व हिंगोली)
३. मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड.
४. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.